॥ सत्यमेव जयते ॥

# ग्रामपंचायत कार्यालय, ओझर (मिग)

ग्रामपालिका ओझर मिग ता. निफाड (नाशिक)

ता. निफाड, जि. नाशिक • फोन (०२५५०) २७५०५४

- बांधकाम परवानगी - (ग्रा.पं.का.क.५२ प्रमाणे)

जावक क्रमांक : ९८०/२०१३ दिनांक : १६/०७/२०१३

श्रीमती शकुंतला दामोधर ओझरकर,अशोक,यशवंत,मधुकर,सुधाकर बाप दामोधर ओझरकर, चित्रा भारत कायस्थ, कु.सीना,नितीन,मयुर,नेहा बाप भारत कायस्थ, मंदा किशोर निकम यांचे ज.मु. व स्वताकरिता डेल्स इस्टेट तर्फे भागीदार श्री.राजेश एकनाथ आहेर

मे.सरपंच साहेब,ग्रामपालिका ओझर,ता.निफाड जि.नाशिक यांजकडून

विषय - बांधकाम परवानगी बाबत..

संदर्भ- आपला बांधकाम परवानगी मिळणे बाबतचा अर्ज..

ग्रामपंचायत ओझर (मिग) ता.निफाड जि.नाशिक येथील गावठाण हद्दीतील सि.स.नं.२०८० ते २०८५ ग्रा.पं.मि.न.५४०पैकी, ५४१, ५४२/१, ५४२/१पैकी, ५४२/२ पैकी चे मिळकतींचे जागी मध्ये आर.सी.सी.इमारत तळमजला १७२.१३ चौ.मी. पहिला, दुसरा , तिसरा व चौथा मजला प्रत्येकी २२८.३१ चौ.मी. असे एकूण १०८५.३७ चौ.मी. चे बांधकामास खालील शर्तींच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे. सदरचे बांधकाम टाऊन प्लॅनिंग नियमाप्रमाणे करण्यात यावे.

शर्त .१- आपण बांधकाम करतांना सरकारी व खाजगी जागेत अतिक्रमण न होऊ देता व कोणतेही रस्त्याचे व इमारतीचे नुकसान न होता बांधकाम करावे

शर्त-.२- ग्रा.पं.मि.नं. ५४०पैकी, ५४१, ५४२/१, ५४२/१पैकी, ५४२/२ पैकी ही प्रॉपर्टी तुमचे नावावर आहे.तुमची मालकी हक्काप्रमाणे जागा मोजून घेऊन त्यात आपण १०८५.३७चौ.मी.चे बांधकाम करावे

शर्त.३- ओझर गांवी टाऊन प्लॅनिंग स्कीम लागू झाल्यास व भविष्य काळातील सर्व रस्तावाढ व वस्तीवाढ या दृष्टीने सार्वजनिक हित लक्षात घेऊन व रस्ता जास्तीत जास्त रुंद सोडून बांधकाम करावे

शर्त.४- टाऊन प्लॅनिंग स्कीममुळे पुढे मागे सार्वजनिक हितासाठी बांधकाम वगैरे काढावे लागल्यास त्यास आपणच जबाबदार रहाल.ग्रामपालिका कोणत्याही प्रकारची जबाबदारी घेणार नाही अगर नुकसान भरपाई देणार नाही.आपल्या जागेची सिटी सर्व्हेच्या नकाशावरुन खात्री करुन घेऊन बांधकाम करावे व घरापुढे आजूबाजूस कमीत कमी ५ झाडे लावणे आवश्यक आहे.

शर्त.५- आपल्या सांडपाण्याची व्यवस्था दुस-या कोणत्याही इमारतीस ओल न येऊ देता आपण स्वतंत्रपणे मालकी हक्काचे जागेत आड तयार करुन करावीत व सांडपाण्याचे घाणीमुळे सार्वजनिक आरोग्यास धोका येऊ देऊ नये.

शर्त.६- निसर्गाचे(पावसाचे)पाणी आपण पूर्व वहिवाटीप्रमाणे काढावे.फेरफार केल्यास त्या पाण्याची व्यवस्था दुस-यास उपद्रव न होऊ देता स्वतःचे मालकी हक्कातून करावी व सांडपाणी गटारीचे पाणी जाण्याची योग्य व्यवस्था करण्यात यावी. रेन वॉटर हार्वेस्टिंगची सोय करणे बंधनकारक राहील.

शर्त.७- आपल्या बांधकामाचे मटेरिअल ग्रामपालिकेच्या पुर्व मंजूरीशिवाय रस्त्यात ठेवू नये.

शर्त.८- बांधकाम परवानगी मिळाले तारखेपासून एक वर्षपर्यंत बांधकामाची मुदत राहील,वर्षानंतर बांधकामाची सुरुवात केल्यास नविन परवानगी घ्यावी लागेल व ही परवानगी रद्द समजण्यात येईल.

शर्त.९- बांधकाम करतांना घरामध्ये संडास बांधणे जरुरीच आहे.घरात संडास नसेल तर बांधकाम परवानगी रद्द समजण्यात येईल.

वरील शर्तीचे व बाबींचे पालन अतिक्रमण होऊ न देता करावे.मालकी जागेत पुढचे रस्त्याचे बाजूने मागे जाऊन अर्ज व प्लॅन प्रमाणे प्रमाणे बांधकाम करण्यास परवानगी दिली आहे.

वरील सर्व शर्ती/अटींचे उल्लंघन झाल्यास परवानगी रद्द करण्यात येईल व पुढील कायदेशीर बाबीस तुम्ही जबाबदार राहाल याची जाणीव ठेवून बांधकाम करावे.

| लिपिक | ग्रामविकास अधिकारी | सभापती, | सरपंच |
|---|---|---|---|
| ग्रा.पं.ओझर (मिग) | ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ओझर (मिग) | बांधकाम समिती | ग्रामपंचायत ओझर (मिग) |
| ग्रामपंचायत, ओझर (मिग) | ग्रा.पं.ओझर (मिग) ता. निफाड जि. नाशिक. | ग्रा.पं.ओझर (मिग) | ग्रा.पं.ओझर (मिग) ता. निफाड जि. नाशिक |

॥ सत्यमेव जयते ॥

# ग्रामपंचायत कार्यालय, ओझर (मिग)

ता. निफाड; जि. नाशिक • फोन (०२५५०) २७५०५४

दिनांक :०४/०६/२०१६

जावक क्रमांक :३४२/२०१६

## बांधकाम पुर्णत्वाचा दाखला

सरपंच/ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत ओझर (मिग) ता.निफाड जि.नाशिक यांचेकडून दाखला देण्यात येती की,श्रीमती शकुंतला दामोधर ओझरकर, अशोक,यशवंत,मधुकर,सुधाकर बाप दामोधर ओझरकर, चित्रा भारत कायस्थ, कु.सीना,नितीन,मयुर,नेहा बाप भारत कायस्थ, मंदा किशोर निकम यांचे ज.मु.व स्वतःकरिता डेल्स इस्टेट तर्फे भागीदार श्री.राजेश एकनाथ आहेर यांनी ओझर गावठाण हद्दीतील ग्रा.पं.मि.नं.५४०पैकी, ५४१, ५४२/१, ५४२/१पैकी,५४२/२पैकी मध्ये आर.सी.सी.इमारतीचे बांधकाम करुन त्यामध्ये ८ गाळे व २४ फ्लॅटचे बांधकाम पुर्ण केले आहे. हा दाखला दिला असे. ता.०१/०६/२०१६

लिपिक
ग्रामपंचायत. ओझर (मिग)

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ओझर(मिग),ता निफाड,जि.नाशिक

J Kawane
सरपंच